# सायबर सुरक्षितता जागरूकतेसाठी शिक्षक, विद्यार्थी सन्मानित

## क्विक हील सीएसआरचा उपक्रम



मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी) : क्विक हील या जागतिक सायबर सिक्युरिटी समाधान प्रदाता कंपनीने आपल्या सीएआर उपक्रमाच्या माध्यमातून मुंबईमध्ये 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा अवॉर्ड्स'चे आयोजन केले. स्वच्छेने सहभागी झालेल्या शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेविषयी, विशेषतः समाजातील वंचित घटकांमध्ये जागरूकता आणण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी या पुरस्कार सोहळयात त्यांचा गौरव करण्यात आला. क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा श्रीम. अनुपमा काटकर आणि चार सहभागी संस्थांमधील शिक्षणतज्ज्ञ यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आले. वालिया कॉलेज अंधेरी, मुंबई येथे हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. स्वच्छेने सहभागी झालेल्या शैक्षणिक संस्था मध्ये अलामुरी रत्नमाला इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनिअरिंग ॲण्ड टेक्नोलॉजी, आसनगाव; केआयएचईएसचे महाराष्ट्र कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स, मुंबई; व्हीपीएमचे बी. एन. बांदोडकर कॉलेज ऑफ सायन्स, ठाणे आणि वालिया सी. एल. कॉलेज ऑफ कॉमर्स व एल. सी. वालिया कॉलेज ऑफ आर्ट्स, अंधेरी, मुंबई यांचा समावेश होता. या सोहळयाला स्वयंसेवी संस्थांमधील १०० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. कॉलेज, शिक्षक आणि विद्यार्थी यांना विविध श्रेणींमध्ये पुरस्कार देण्यात आले, ज्यासाठी विजेते त्यांच्या 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' उपक्रमात सक्रिय सहभाग दर्शवून कृती, उपक्रम आणि प्रसार प्रयत्नांचे वर्णन करणाऱ्या महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या डेटानुसार अंतिम करण्यात आले.